तालुका बिजगुणन केंद्र, गल्ले बोरगाव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद येथील कृषि विभागाची जमिन, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या विद्यापीठास, मका या पिकाच्या संशोधित वाणाच्या लागवडीसाठी/ संशोधनाकरीता वापरण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक : ताबिके १११६/प्र.क्र.३८/१अे

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : ०२ जून, २०१८

वाचा :- १) कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे पत्र जावक क्रमांक :- गुनि १-२/ताबिप्र/जमिन/ ११३/२०१६, दिनांक ३१.३.२०१६.

२) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे पत्र जावक क्रमांक :- मकृप /संशोधन/ १३४५/२०१३, दिनांक ९.७.२०१३.

प्रस्तावना :-

तालुका बिजगुणन केंद्र, गल्ले बोरगाव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद या बिजगुणन केंद्राची निर्मिती सन १९५८ साली करण्यात आलेली आहे. सदर तालुका बिजगुणन केंद्राचे एकूण **क्षेत्र २०.८३ हेक्टर** असून, सदर क्षेत्रावर बीज निर्मिती कार्यक्रम, गांडुळ खत तयार करणे, निंबोळी पावडर तयार करणे, युरीया ब्रिकेट, दशपर्णी अर्क, निमार्क तयार करणे, तसेच, शेतकरी प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रम राबविले जातात. तालुका बिजगुणन केंद्र, गल्ले बोरगाव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद येथील जमिनीचा / काही क्षेत्राचा वापर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या विद्यापीठास, मका पिकाच्या संशोधित वाणाच्या लागवडीसाठी व संशोधनासाठी (Research Planting Material) करण्यास, मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

तालुका बिजगुणन केंद्र, गल्ले बोरगाव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद येथील जमिनीचा / काही क्षेत्राचा वापर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या विद्यापीठास, “मका” पिकाच्या संशोधित वाणाच्या लागवडीसाठी व संशोधनासाठी (Research Planting Material) करण्यास, शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. तालुका बिजगुणन केंद्र, गल्ले बोरगाव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद येथील, कृषि विभागाच्या जमिनीपैकी काही क्षेत्र मका पिकाच्या संशोधित वाणाच्या लागवडीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उर्वरित क्षेत्रावर कृषि विभागाने बिजोत्पादनाचा कार्यक्रम व इतर कार्यक्रम चालू ठेवावेत. मका संशोधनाकरीता आवश्यक असलेले मनुष्यबळ, यंत्र सामुग्री, इत्यादी बाबी, तालुका बिजगुणन केंद्र प्रमुख, गल्ले बोरगाव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद, तसेच, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना उपलब्ध करून द्याव्यात. मका पिकाच्या संशोधित वाणाची लागवड / संशोधन / देखभाल/ काढणी, इत्यादीसाठी येणारा देखभाल खर्च वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी स्वत: करावा किंवा तालुका बिजगुणन प्रक्षेत्रावरील असलेले मनुष्यबळ वापरून सदरचे काम करून घ्यावयाचे असल्यास सदरचा निधी शासकीय निकषाप्रमाणे कृषि विभागास द्यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०२१५००२८६६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Umesh Narayan Chandiwade

Digitally signed by Umesh Narayan Chandiwade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0a3a08c7339c487fe2836238383bf91bbd037b93b4bdf6c8e95d1969e585fffe, cn=Umesh Narayan Chandiwade
Date: 2018.06.02 15:03:02 +05'30'

(उमेश चांदिवडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद.
६) कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
७) कुलगुरू, सर्व कृषि विद्यापीठे.
८) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) सह सचिव (नि . व गु.नि.), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सह सचिव (कृषि विद्यापीठे/७अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) जिल्हाधिकारी, औरंगाबाद.
१२) संशोधन संचालक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
१३) संचालक, संशोधन महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परीषद, पुणे.
१४) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१५) सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१६) विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद.
१७) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद.
१८) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
१९) कक्ष अधिकारी, कार्यासन ७अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) सर्व कक्ष अधिकारी / अवर सचिव / उप सचिव / सह सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती (कार्यासन १अे), कृषि व पुदम विभाग, मंत्रालय, मुंबई.